**MHKO100011382020**

नियमित दिवाणी दावा क्र. ९४/२०२० मधील निशाणी क्र. ४८ वरील आदेश

वादी यांनी सदरचा अर्ज प्रतिवादी क्र. ३ चे वारस रेकॉर्डवर घेणेसाठी झालेला विलंब माफीसाठी व अबेंटमेंटचा आदेश रद्द होवून मिळणेसाठी दाखल केला आहे.

**२.** वादी यांचा अर्ज व त्यावर प्रतिवादी यांनी दाखल केलेले म्हणणे वाचले. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. दोन्ही बाजूंनी त्यांच्या अर्जातील कथनाप्रमाणेच युक्तीवाद केलेला आहे.

**३.** वादी यांचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र. ३ श्री. सोपान रामचंद्र दळवी हे दिनांक २७/११/२०२२ रोजी मयत झाले आहेत. वादी यांना मयताचे वारसाना मुदतीत रेकॉर्डवर आणावे लागते याचे कायदेशिर ज्ञान नव्हते. सबब मयताचे वारस रेकॉर्डवर आणणेस विलंब झालेने अबेंटमेंटचा आदेश झालेला आहे. वादी यांनी वारस रेकॉर्डवर आणणेसाठी जाणुनबुजून टाळाटाळ केलेली नाही. सबब वादी यांनी प्रतिवादी क्र. ३ यांचे विरुध्द झालेला अबेटमेंट आदेश रद्द होवून वारस रेकॉर्डवर आणणेस झालेला विलंब माफ होवून मिळणेची विनंती केली आहे.

**४.** प्रतिवादी यांनी आपले म्हणणे सादर केले आहे. त्यांचे असे म्हणणे आहे की, प्रतिवादी क्र. ३ हा दिनांक २७/११/२०२२ रोजी मयत झाला आहे. सदर कामी वादी यांनी दिनांक २०/११/२०२३ रोजी प्रतिवादी क्र. ३ मयत झालेबाबत निशाणी क्र. ४४ ला पुरसीस दाखल केली होती. तरी देखील वादी यांनी प्रतिवादी क्र. ३ चे वारस रेकॉर्डवर आणणेस जवळजवळ ४ महिन्यांचा विलंब केलेला आहे. वादी हे प्रतिवादी यांना त्रास

देणेसाठी व जाणुनबुजून काम लांबविणेसाठी सदरचे वारस रेकॉर्डवर आणणेस विलंब केलेला आहे. सबब वादी यांचा अर्ज नामंजूर करणेत यावा व मंजूर करावयाचा झालेस रुपये २०००/- खर्च बसविणेत यावा अशी विनंती केली आहे.

**५.** वादी यांनी सदरचा दावा प्रतिवादी यांचे विरुध्द हक्कज्ञापनासाठी, कब्जासाठी व आज्ञाथी मनाईसाठी दाखल केला आहे. वादी यांनी सदरचा अर्ज शपथेवर दाखल केला आहे. सदरच्या दाव्याचा गुणदोषावर निकाल करणेसाठी प्रतिवादी क्र. ३ यांचे वारस रेकॉर्डवर येणे गरजेचे आहे. त्याकरीता वादी यांनी प्रतिवादी क्र. ३ यांचे विरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द होवून त्यांचे वारस रेकॉर्डवर आणणेस झालेला विलंब माफ होणे गरजेचे आहे. प्रतिवादी क्र. ३ चे वारस रेकॉर्डवर घेतल्यामुळे प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. वादी यांनी प्रतिवादी यांचे वारस रेकॉर्डवर घेणेसाठी विलंब केलेला आहे हे प्रथमदर्शनी दिसून येते. त्यामुळे सदरचा अर्ज प्रतिवादी यांना खर्चादाखल रक्कम देणेच्या अटीवर मंजूर करणे न्यायोचीत होणार आहे. परिणामतः मी, खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

## आ दे श

प्रतिवादी यांना खर्चादाखल रक्कम रुपये ३००/- (अक्षरी रुपये तीनशे मात्र) देणेच्या अटीवर अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

DHANASHRI MAHADEV PAWAR
Digitally signed by DHANASHRI MAHADEV PAWAR
Date: 2023.08.16 11:32:53 +0530

ठिकाण – गडहिंग्लज
दिनांक ११/०८/२०२३

डी. एम. पवार
दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर.
गडहिंग्लज

MHKO100011382020

नियमित दिवाणी दावा क्र. ९४/२०२० मधील निशाणी क्र. ५० वरील आदेश

वादी यांनी सदरचा अर्ज प्रतिवादी क्र. ३ श्री. सोपान रामचंद्र दळवी यांचे वारस रेकॉर्डवर घेणेसाठी दाखल केला आहे.

**२.** वादी यांचा अर्ज व त्यावर प्रतिवादी यांनी दाखल केलेले म्हणणे वाचले. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. दोन्ही बाजूंनी त्यांच्या अर्जातील कथनाप्रमाणेच युक्तीवाद केलेला आहे.

**३.** वादी यांचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र. ३ श्री. सोपान रामचंद्र दळवी हे दिनांक २७/११/२०२२ रोजी मयत झाले आहेत. त्यांना अर्जात नमुद हेच सरळ व कायदेशिर वारस असून याशिवाय अन्य कोणीही वारस नाही.

**४.** वादीने यांनी सदरचा दावा हक्कज्ञापनासाठी, कब्जासाठी व आज्ञार्थी मनाईसाठी दाखल केला आहे. वादी यांनी सदरचा अर्ज शपथेवर दाखल केला आहे. सदरच्या दाव्याचा गुणदोषावर निकाल करणेसाठी प्रतिवादी क्र. ३ यांचे वारस रेकॉर्डवर येणे गरजेचे आहे. वादी यांचा निशाणी ४८ वर प्रतिवादी क्र. ३ चे वारस रेकॉर्डवर घेणेसाठी झालेबा विलंब माफीचा व अबेटमेंटचा आदेश रद्द होवून मिळणेबाबतचा अर्ज मंजूर करण्यात आहे. सबब खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

**आ दे श**

१) अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२) वादी यांनी दाव्यात प्रतिवादी क्र. ३ च्या वारसाबाबत योग्य ती दुरुस्ती करुन दुरुस्ती प्रत सत्वर दाखल करावी.

ठिकाण – गडहिंग्लज
दिनांक ११/०८/२०२३

डी. एम. पवार
दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर.
गडहिंग्लज